# रासेयोच्यावतीने क्रांतिदिन साजरा



मार्गदर्शन करताना प्राचार्य त्रिवेणी सोनोने, सोबत उपस्थित मान्यवर.

खामगाव : स्थानिक श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे क्रांतीदिन रविवारी साजरा करण्यात आला. यानिमित्त पत्रकारांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ.श्रीमती त्रिवेणी सोनोने होत्या. प्रमुख अतिथी म्हणून प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, लोकमतचे उपसंपादक गिरीश राऊत, पत्रकार अनुप गवळी, विजय कुलकर्णी, सचिन ठाकरे, नितेश मानकर, नाना हिवराळे यांची उपस्थिती होती.

यावेळी ज्ञात व अज्ञात हुतात्म्यांचे स्मरण चिरकाल राहण्यासाठी अशा कार्यक्रमाचे आयोजन करणे गरजेचे आहे, असे प्रास्ताविकात डॉ.वसंत डोंगरेंनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ.त्रिवेणी सोनोने म्हणाल्या की, पत्रकार हे वर्तमान काळातील क्रांतीकारक असून ते आपल्या लेखनीतून नेहमी समाजाला दिशा देण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांचा सत्कार होणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी क्रांतीकारक महापुरषांच्या जीवन कार्याची माहिती उपस्थितांना दिली. संचालन पुनम बोंबटकार तर आभार प्रा.अभय गद्रे यांनी मानले.. कार्यक्रमाचा शेवटी अनुसया म्हसाळ या विद्यार्थीनीने 'ऐ मेरे वतन के लोगो' या स्फुर्तीदायी देशभक्तीपर गीत सादर केले. त्यावेळी अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या.

(प्रतिनिधी)

दै. तरुणभारत दि. 13·8·15

# महिला महाविद्यालयात रासेयोच्या वतीने क्रांतीदिन साजरा





विद्यार्थीनींना मार्गदर्शन करताना दैनिक तभाचे विजय कुळकर्णी, उपस्थित प्राचार्या डॉ.सोनोने, प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत देशमुख आदी.

**तभा वृत्तसेवा**
**खामगाव, १२ ऑगस्ट**

स्थानिक श्रीमती सु.रा. मोहता महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ९ ऑगस्ट रोजी क्रांतीदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त दै. तरुण भारत, दै.सकाळ, दै.लोकमत, दै.देशोन्नती, दै.प्रश्नकाल, दै.लोकोपचार या वर्तमानपत्राचे संपादक व पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. त्यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.त्रिवेणी सोनोने होत्या. प्रमुख अतिथी म्हणून प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, प्रश्नकालचे सहसंपादक अनुप गवळी, तरुणभारतचे संपादक विजय कुळकर्णी, देशोन्नतीचे पत्रकार सचिन ठाकरे, दै.लोकोपचार व दै.सकाळचे पत्रकार नितेश मानकर व दै. लोकमतचे पत्रकार, नाना हिवराळे व गिरीश राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन रासेयो अधिकारी प्रा.ज्ञानेश्वर बोंपीलवार यांनी केले.

ज्ञात व अज्ञात हुतात्म्यांचे स्मरण आयोजन करणे गरजेचे आहे, असे प्रास्ताविकात डॉ.वसंत डोंगरेंनी प्रतिपादन केले. प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत देशमुख यांनी अनमोल मार्गदर्शन केले. दै. तरुणभारतचे संपादक विजय कुळकर्णी यांनी आपल्या भाषणातून स्वातंत्र्य आंदोलनात बजावलेल्या वृत्तपत्रांचा ऐतिहासिक आढावा घेतला. दै.देशोन्नतीचे पत्रकार सचिन ठाकरे यांच्या मते राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत जर क्रांतीदिनासारखे कार्यक्रमाचे आयोजन केले तर क्रांतीवीरांचे स्मरण होऊन तरुणांना स्फुर्ती मिळते, असे मत गिरीश राऊत यांनी कार्यक्रमाला अनुसरुन समर्पक विचार मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्या डॉ. सोनोने म्हणाल्या की, पत्रकार हे वर्तमान काळातील क्रांतिकारक असून, ते आपल्या लेखणीतून नेहमी समाजाला दिशा देण्याचे काम करतात. त्यामुळे त्यांचा सत्कार होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूनम बोंबटकार यांनी, तर आभार प्रा.अभय गद्रे यांनी केले. कार्यक्रमाचा शेवट अनुसया म्हसाळ यांच्या 'ऐ मेरे वतन के लोगों' या



राष्ट्रीय सेवा योजना आयोजित




# Report

## Year 2015-16

**Sub :- Kranti Din.**

The programme of Kranti Din was organized by NSS Department on 09-08-2015. On this occasion the journalists of local newspapers were invited. They were felicitated in this function at the hands of Hon'ble Principal Dr. Triveni Sonone. Journalists are revolutionist of present day because they can use their pen as sword. Journalist Mr. Prashant Deshmukh, President of Press Club Khamgoan was the chief guest of this function. Journalists Girish Raut, Anoop Gawali, Vijay Kulkarni, Sachin Thakare, Nitesh Mankar, Nana Hiwrale also took active participation. The programme was over by the recitation of famous patriotic song "Ae Mere Watan Ke Logo" which was sung by the B. A. I student Ku. Anusaya Mhasal.

PRINCIPAL
Smt. S. R. Mohata Mahila
Mahavidyalaya, Khamgaon